Impact Factor - 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


December -2019

SPECIAL ISSUE-CCV

# भारतीय अर्थव्यवस्था : स्थिती व दिशा

## Indian Economy : Condtion & Direction

Volume -1




Guest Editor
Dr. Subodh kumar Singh
(Principal)
Prof.Ravindra B.Shende
HOD, Dept of Economics
Lokmanya Mahavidyalaya,
Warora,Dist-Chandrapur (MS)

Executive Editor:
Prof. Virag S. Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Chief Editor
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013) | December 2019
Special Issue

# भारतातील ग्रामिण विकासाचे वास्तव: एक अवलोकनात्मक अभ्यास

प्रा. डॉ. मंगेश कडू
राज्यशास्त्र विभागप्रमुख भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

विकास ही अव्याहतपणे चालणारी, गतिशील आणि कालसापेक्ष प्रक्रिया आहे मानवी जिवनाच्या आरंभापासून ते त्याच्या अंता पर्यंत ही प्रक्रिया अशीच अव्याहतपणे सुरू राहणार आहे. ह्यामध्ये सांस्कृतीक, सामाजीक, राजकीय, आर्थिक ह्यासारख्या मानवी जीवनाच्या काही अभिन्न वमुख्य बाजूंचाच विचार साधारणत: शासनस्तरावर अथवा प्रशासनीक स्तरावर केला जातो. म्हणूनच 'विकास' ह्या संकल्पनेचा विचार अभ्यासकगुण्दा मानवी जीवनाच्या काही निवडकबाजूंच्या संदर्भातच करतांना दिसतात. अर्थात, कोणत्याही प्रकारच्या विकासाचा प्रथम आणि अंतिम उद्देश हा व्यक्तीला सुखी, सुरक्षीत, समाधानी आणि प्रतिष्ठापूर्ण जीवनाची प्राप्ती करून देणे हाच असतो. व्यक्तीचे विस्तृत रूप म्हणून समाज आणि समाजाचे विस्तृत रूप म्हणून राष्ट्राला सुध्दा विकासाचा हाच उद्देश लागू होतो. विकास म्हणजे, 'व्यक्तीला सुखी, सुरक्षीत, समाधानी व प्रतिष्ठीत जीवनाची प्राप्ती करण्यासाठी किमान पातळीवर आवश्यक असणाऱ्या भौतिक संसाधनाची व्यवस्थेकडून नियोजनबध्द पध्दतीने आवश्यक प्रमाणात जाणिवपुर्वक केलेली निर्मिती असते. ह्यासंदर्भात अमर्त्यसेन असे म्हणतातकी,''आर्थिक विकास हा फक्त आर्थिक वृध्दीवर अवलंबून नसतो तर तो चांगल्या उंचावलेल्या जीवन पातळीवर अवलंबून असतो.त्यासाठी अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. अंधश्रध्दा व निरक्षरतेतून लोकांना मुक्त केले पाहिजे.तसंच स्वातंत्र्याचा हक्क आर्थिक विकासाशी संबंधीत आहे ह्याची जानीव लोकांमध्ये निर्माण व्हायला पाहिजे. विकास हा जीवनाशी निगडीत असून जीवनातील आनंद स्वातंत्र्याशी निगडीत आहे.''[1]

२१व्या शतकाच्या आरंभापर्यंत जगात भारताची ओळख एक कृषीप्रधान देश अशी होती.त्यानंतर कृषीप्रधानता ही ओळख कमी होत गेली आणि ती उद्योगप्रधान विकसनशील देश अशी काहीप्रमाणात व्हायला लागली.१९८० नंतरभारतात सर्वच क्षेत्रात परिवर्तनाच्या प्रक्रीयेने अधिक जोर पकडला. विज्ञान, माहिती–तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, अंतराळ, आरोग्य, शिक्षण, कृषी, प्रशासन, कायदा, न्याय ह्यासारख्या क्षेत्रात अमुलाग्रबदल अनुभवायला येवू लागले. ह्याच काळात विकासाची संकल्पनाही बदलायला सुरवात झाली. विकासाचा संबंध केवळ पायाभूत सुविधा आणि भौतिक जीवनाच्या दृष्टीने वस्तू व सेवांची अधिकतम उपलब्धताह्याच्याशीच जोडला जावू लागला. अर्थात ह्या दोन्ही बाबी ग्रामिण भागातील सामान्य नागरिकांच्या कल्पनेबाहेरील असल्यामूळे, त्याच्या आकर्षनातूनग्रामिण भागातील लोक मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थालांतर करू लागले. त्यातून अनेक समस्या तर निर्माण झाल्याच पण नेमक्या विकासाच्या बाबत गोंधळाची स्थिती निर्माण झाली आणि ती आजच्यागायत कायम आहे.लोकांना उंचावलेली जीवन पातळी प्राप्त करून देणे, अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, अंधश्रध्दा व निरक्षरतेतून लोकांना मुक्त करणे हे विकासाचे मूळ उद्दिष्टे मागे पडून केवळ भौतिक साधनांची अतिरेकी उपलब्धता हाच विकासाचा अर्थ भारतीय समाजात रूढझाला. त्या बदलांचा परिणामएकंदर विकासाच्या प्रक्रियेवर देखील झाला.

ह्याचदरम्यान, शहरीकरणाचा वेग प्रचंड होता. परिणामत: शहरातील पायाभूत सुविधा व उपलब्ध साधने अपर्याप्त ठरू लागलीत. त्याचप्रमाणे ग्रामिण भागातून लोकांचे शहरांकडे मोठ्या प्रमाणावर झालेल्या स्थालांतरणामूळे ग्रामिण भागातही सर्वप्रकारच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. कृषी क्षेत्र ह्यामूळे सर्वाधिक प्रभावीत झाले. तात्पर्य, विकासाच्या चूकीच्या अन्वयार्थामूळे खऱ्या विकासाची दिशा भारतीय व्यवस्थेला प्राप्त होऊ शकली नाही.

भारतीय संविधानातील आर्थिक बाजूंचा खोलवर विचार केला, तर भारताच्या आर्थिक विकासाचा मुख्य आधार हा ग्रामिण भागच आहे हे लक्षात येते. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्ती पासूनच भारताच्या आर्थिक नियोजनात ग्रामिण क्षेत्रे आणि शेती सारखे विषय केंद्रस्थानीअसलेले केवळ दिसतच नाही, तर ते विषय तितक्याच तिव्रतेने आणि गतिमानतेने हाताळलेले दिसतात. दिसतात.म्हणूनच वर्तमानात भारतीय अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झालेले अडचणी आणि संकटे तत्कालीन अर्थव्यवस्थेत इतक्या टोकाच्या स्वरूपात निर्माण झालेली दिसत नाही.

विकासाचा सरळ संबंध हा दारिद्र्य निमुर्लनाशी येतो. सर्वसाधारणपणे ज्या देशात दारिद्र्याचे प्रमाण हे अत्यल्प असते त्या देशाला 'विकसीत' असे नामाभिधान लावले जाते.दारिद्र्य दोन घटकांशी निगडीत असते, प्रथम व्यक्तीची मानसिकता आणि व्दितीय व्यक्तिीची आर्थिक परिस्थिती. हे दोन्ही घटक परस्पर संबंधीत आणि आंतरक्रीयेने जुळलेले आहेत. वर्तमानातील अधिकतर अर्थशास्त्राचे अभ्यासक आणि अर्थतज्ञ दारिद्र्याचा संबंध व्दितीय म्हणजे व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीशीच जोडतात आणि म्हणूनच त्यांना देशातील नागरीकांची आर्थिक स्थितीतील सकारात्मक बदल म्हणजेच विकास

[1] डॉ. देशपांडे, डॉ. लेले, प्रा. भजने, 'भारतीय अर्थव्यवस्था, विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र', पी. पी. पब्लिकेशन्स, गोकुळपेठ, नागपूर. २०१५. पृ. क्र. ५३०

-2022 21.32 - New Doc 03-27-2022 21.32.pdf file:///C:/Users/SHINDE/Downloads/New Doc 03-27-20


वाटतो. परंतू केवळ ह्याच दृष्टीकोनातून विकासाचा विचार करणे एकांगी होते. भारतात दारिद्र्य निमुर्लनाच्या जितक्या योजना व उपाययोजना स्वातंत्र्य मिळाल्यापासून राबवीण्यात आल्या तितक्या जगातील कोणत्याही देशात आजपर्यंत राबवीण्यात आलेल्या नाही. तरीही भारतातील दारिद्र्याची समस्या एकविसाव्या शतकातही जशीच्या तशीच आहे, नव्हे ती दिवसों दिवस अधिक्क गंभिर होत असतांना दिसते आहे. ह्याचे कारण इतर विकसित देशांप्रमाणे भारतात व्यक्तीच्या मानसिकता बदलाच्या प्रक्रियेकडे अजूनही फारसे गांभिर्याने पाहिले जात नाही. त्यामूळेच रोजगाराच्या संधीची शक्यता,रोजगाराची पातळीआणि पूर्ण रोजगाराच्या स्थितीलाच 'विकास' किंवा 'आर्थिक विकास' असे संबोधले जाते.आर्थिक विकास म्हणजे राज्यात पूर्ण रोजगाराची स्थिती असे मानण्यात येते. ह्यासंदर्भात लॉर्ड केन्सच्या असे म्हणतो की, ''आर्थिक विकासात पूर्ण रोजगार पातळीला सर्वाधिक महत्व असते. राज्यातील रोजगार जसजसा वाढत जातो, तसतसा आर्थिक विकासाचा वेग देखील वाढत जातो. महत्तम सामाजिक विकास हा नियोजनाचा प्रमुख उद्देश पूर्ण रोजगाराची पातळीच पूर्ण करते.''[१]लॉर्ड केन्सच्या ह्या व्याख्येत केन्स केवळ रोजगाराच्या माध्यमातून आर्थिक बाजूचाच विचार करतांना दिसतो. पण आर्थिक बाजू ही व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असते, म्हणून ती विकासाचा विचार करतांना दुर्लक्षीत करता येत नाही. विकासाची पातळी टिकऊन ठेवणे ही देखील विकासाच्या संदर्भात असलेली गंभीर समस्या आहे. ती व्यक्तीच्या मानसिकतेतील बदलातूनच सोडवीली जावू शकते.

सुचना व उपाययोजना:

१. विकासाचा त्याच्या उद्दिष्टांच्या संदर्भातच वास्तविक अर्थ निश्चित करून त्या अनुषंगाने लोकांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे.
२. ग्रामिण क्षेत्र आधारभूत ठरवून अर्थिक वराजकीय धोरणांची पुढील काळात निर्मिती करणे गरजेचे आहे.
३. त्या धोरणांच्या प्रभावी आणि वास्तवीक अमंलबजावणीसाठी प्रशासन यंत्रणेची नव्याने उभारणी व गतिमान प्रशासननिर्माण करणे अत्यावश्यक आहे.
४. लोकांमध्ये उद्यमशिल व सृजनशिल मानसिकतानिर्माण करण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न होणे गरजेचे आहे.
५. ग्रामिण भागात स्थानिक संदर्भ लक्षात घेऊन पायाभूत सुविधांची निर्मिती करणे अत्यंत गरजेचे आहे.
६. ग्रामिण विकास धोरणांच्या अमंलबजावनीत अडचणीचे व गुंतागुंतीचे नियम अथवा कायद्यांचे पुर्नवलोकन करून सुधारीतनियम/कायद्यांची निर्मिती केली जावी.

उपसंहार:

ग्रामिण विकासाच्या संदर्भात बदलत्या आर्थिक आणि सामाजीक परिस्थितीच्या संदर्भांचा विस्तृत आढावा घेऊन त्याअनुषंगाने नव्याने नियोजन करणे अगत्याचे आहे असे प्रस्तुत अभ्यासकाला वाटते. नव्वदीच्या दशकापर्यंत आणि नव्वदी नंतरचा कालखंडात भारतातील ग्रामिण आर्थिक व सामाजीक परिस्थितीत बरीच तफावत आल्याचे विभिन्न शासकीय आणि इतर सर्वेक्षण अहवाल आणि आर्थिक विषयाच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. हे बदल विकासाच्या मापदंडात एकूनच वरकरणी सकारात्मक वाटत असले, तरी बहुतांशी ते विपरीत दिशेने नेणारे ठरले आहेत, हे सुक्ष्म अभ्यासाअती लक्षात येते.ग्रामिण विकास विपरित देशेला जाण्याचा परिणाम हा केवळ ग्रामिण क्षेत्रापुरताच मर्यादीत राहीला असे नाही, तर तो शहरी भागावर त्यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर झाल्याचे निरीक्षण अनेक अभ्यासकांनी/अर्थतज्ञांनी अनेकदा नोंदवीलेले आहे. मुख्यतच, प्रारंभीची स्वातंत्र्योत्तर तिन–चार दशके आणि एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकाचा अपवाद वगळला तर ढोबळमानाने असे निदर्शनास येते की, उर्वरीत काळातील भारताची आर्थिक धोरणे आणि त्यासाठी असणारे आर्थिक नियोजन ही भारतातील ग्रामिण विकासाला न्याय देणारी नव्हती. इतकेच नव्हे तर केवळ पायाभूत सुविधांनाच (रस्ते, विज, दळणवळन इ.)विकासाचे प्रमाण मानणाऱ्याशासनाच्या काळात ग्रामिण भागात पायाभूत सुविधांची निर्मिती देखिल होऊ शकलेली नाही. म्हणून नव्याने ह्यासंर्भात प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामध्ये शिक्षणाव्दारे लोकांच्या मानसिकतेत पुरक असे बदल घडवून आणणे ह्यासंदर्भात हितकारकच ठरेल.

ग्रंथ सुची:

१. कुळकर्णी डॉ. श्री. प., साठे डॉ. शुभा, कडू डॉ. मोहिनी, 'भारतीय राजकारण: दशा आणि दिशा', विजय प्रकाशन, नागपूर, २००५
२. श्रीनिवासएस. एन., 'आधुनिक भारत में सामाजिक परिवर्तन', राजकमल प्रकाशन, नयी दिल्ली, २००३
३. पळशीकर सुहास, 'समकालीन भारतीय राजकारण', प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, २००४
४. देशपांडेडॉ. प्राची, लेलेडॉ. माधुरी, भजनेप्रा. कल्पना, 'भारतीय अर्थव्यवस्था, विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र', जो. सी. पब्लिशर्स, गणेशनगर, नागपूर, २०१५

[१] तित्र. ५३४

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
ISSN : 2348-7143
December 2019

५. सोमलकर, डॉ. प्रकाश, डोंगरे, प्रा. राजेश 'भारतीय अर्थशास्त्र-१', सार साहित्य केंद्र, हुडकेश्वर रोड, नागपूर २०१८
६. अवस्थी डॉ. अमरेश्वर, माहेश्वरी डॉ. श्रीराम, 'लोक प्रशासन', लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा १९९७
७. अवस्थी डॉ. अमरेश्वर, माहेश्वरी डॉ. श्रीराम, 'भारत में लोकप्रशासन', लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा १९९५
८. पाटील (निलँगेकर) शिवाजीराव, 'राजकीय जागृती, संघटन आणि परिवर्तन', ऋचा प्रकाशन, नागपूर, २००६

RESEARCH JOURNEY